जळगाव प्रतिनिधी (दि. ८ ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आज विद्यापीठ परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला विद्यार्थ्यांसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळे, रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलचे अध्यक्ष जितेंद्र बर्डे, कॉर्डिनेटर महेंद्र रायसोनी, डॉ. सारंग खासणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले. यानंतर विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रक्तदानात सहभाग नोंदवला.

रोटरी क्लबच्या सहकार्याने आयोजित या शिबिराचा उद्देश समाजातील गरजू रुग्णांना वेळेत रक्तपुरवठा करण्यासाठी मदत उपलब्ध करून देणे हा होता. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे वैद्यकीय पथकातील मयूर पाटील बलभीम गिरी आणि बाळासाहेब पाटील आणि रोटरी क्लब, रेडक्रॉस रक्तपेढी चे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

**बातमी नं. २**

जळगाव प्रतिनिधी (दि. ८ )- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत 'विद्रोही जलसा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे उपस्थित होते.

यावेळी बोलताना महेश सूर्यवंशी यांनी जलसा म्हणजे काय? याचा अर्थ सांगितला जलसे हे माणसाला माणसाशी जोडणारे, व्यथा प्रसूत करणारे परंतु सामाजिक बांधिलकी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य करते. यावेळी त्यांनी उदाहरण म्हणून अनेक शाहिरांच्या जलसा ची माहिती दिली.

यावेळी चर्चमध्ये वादळाचे वंशज, विद्रोहाचे पाणी पेटले' अशा सामाजिक प्रबोधन करणाऱ्या ग्रंथांची चर्चा करण्यात आली. सामाजिक बदल, जाणीव निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक चळवळीला बळकटी देण्याचे काम जलसा करीत असते असे डॉ. दीपक खरात यांनी त्यांचे मत मांडले. तर विद्रोही जलसा, आंबेडकरी जलसा, व सत्यशोधकी जलसा यातील फरक काय? हा प्रश्न यावेळी डॉ. भारती सोनवणे यांनी प्रमुख वक्त्यांना विचारला. विद्रोही जलसे ही प्रामुख्याने बहुजन समाजाशी निगडित असल्याने जलसे हे भावनिक आहेत की प्रबोधनात्मक आहे असाही वाजवी प्रश्न यावेळी कृष्णा संदानशिव यांनी उपस्थित केला.

अध्यक्षीय मनोगतातून प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु पगारे म्हणाले की, लिखाण हे तात्विक, सैद्धांतिक, करायचे असल्यास त्यातल्या उणिवा ओळखून लिखाण केल्यास ते पूर्णत्वाकडे जाते. सुरुवातीच्या काळात सत्यशोधकी जलसे हे महत्त्वपूर्ण ठरलेले दिसून येतात, सत्यशोधकी जलसे हे सामान्य लोकांचे विशेषतः शेतकऱ्यांचे प्रश्न उद्बोधनाच्या माध्यमातून मांडताना दिसून येतात. विद्रोही जलसे हे क्रांती, संशोधन व आव्हानाचे मुख्य स्वरूप ठरते. सोबतच सामाजिक बंडाची भूमिका विद्रोही जलशांमधून पहावयास मिळते असे त्यांनी यावेळी म्हटले.

याप्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक, डॉ. सुदर्शन भवरे, प्रतिभा गलवाडे, डॉ. प्रिती सोनी, पल्लवी, नेहा लाम्हणे, व संशोधक विद्यार्थी, खेमराज पाटील, महेश सुर्यवंशी, जितेंद्र नाईक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती मनुचारी तर आभार खेमराज पाटील यांनी व्यक्त केले.

**बातमी नं. ३**

जळगाव प्रतिनिधी (दि. ८ ) - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन व विस्तार विभागाद्वारे 10 डिसेंबर 2025 पासून विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे.

या अभ्यासक्रमांमध्ये भारतीय आणि विदेशी भाषा जसे जर्मन जपानी, जर्मन भाषा A1 स्तर, संस्कृत, मोडीलिपी या शिक्षणक्रमांसोबत सायबर गुन्हे आणि कायदे, मानसशास्त्रीय कसोट्या आणि मोजमाप, लिंग संवेदनशीलता, ज्येष्ठ नागरिक

सहाय्यता दूत, कवयित्री बहिणाबाई: जीवन व काव्य तथागत भगवान बुद्ध आणि त्यांचे तत्त्वज्ञान, एकात्म मानवदर्शन, समग्र एकात्मिक पालकत्व आदी शिक्षणक्रमांचा समावेश आहे.

या अभ्यासक्रमांचे वैशिष्टे म्हणजे ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्याची सुविधा, विषय तज्ज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकांद्वारे मार्गदर्शनाची संधी, आठवड्यातून दोन दिवस ऑनलाईन वर्ग सुविधा तर काही शिक्षणक्रमात प्रात्यक्षिक कार्यसाठी विद्यापीठात यावे लागते. शिक्षणक्रमअंतर्गत कार्य यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतरच विद्यापीठाकडून अधिकृत प्रगाणपत्र मिळते. त्यामुळे ऑनलाईन प्रवेश किंवा अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला आजच भेट देऊन संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जातात नोकरी व्यवसाय करून शिक्षणाची संधी समाजातील सर्व घटकांसाठी या विभागाद्वारे उपलब्ध करून दिली जाते. एकापेक्षा अनेक भाषांचे ज्ञान जर त्यास असेल तर जागतिक स्तरापर्यंतच्या रोजगाराच्या संधी मिळू शकतात. या हेतूने विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली आजीवन विभागाद्वारे आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थी कौशल्याधीष्टीत होण्यासाठी घरी बसल्या बसल्या ऑनलाईन पद्धतीने विविध प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता